# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,सेनापति बापट मार्ग,
प्रभादेवी रेल्वे स्थानकाजवळ मुंबई- ४०० ०१३
दूरध्वनी : ०२२-४२२६६४५ / ०२२-४३२२६८१२ ई मेल mlwbprog@gmail.com

जा.क्र.मका/कार्यक्रम/२०२२-२३/६३४ दिनांक: १७ /११/२०२२

**परिपत्रक**

विषय:-औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २६ वी आणि महिलांसाठी २१ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा-२०२२-२३

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या औद्योगिक व व्यावसायिक कामगारांसाठी २६ वी आणि महिलांसाठी २१ वी खुली राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा दिनांक २४ ते २७ जानेवारी,२०२३ या कालावधीत हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-१३ येथे आयोजीत करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेत भाग घेणाऱ्या संघासाठी प्रवेशिका स्विकारण्याची अंतिम तारीख १६ जानेवारी,२०२३ अशी आहे. स्पर्धेचे प्रवेश अर्ज, माहितीपत्रक, भिंतीपत्रक इत्यादी स्वतंत्र पत्राने गट व विभागीय कार्यालयाकडे पाठविण्यात येणार आहे.

तरी मंडळाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपरोक्त स्पर्धेची माहिती आपापल्या परिसरातील आस्थापनांच्या तसेच महिला कबड्डी संघांना देऊन प्रसिध्दी करावी व स्पर्धेत जास्तीत जास्त संघ सहभागी होतील यासाठी प्रयत्न करावेत.

कल्याण आयुक्त

प्रत:

१) प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.- वर्तमानपत्रा मध्ये प्रसिध्दी देण्यात यावी.
२) सर्व सहायक कल्याण आयुक्त/प्र.सहायक कल्याण आयुक्त,सर्व विभागीय कार्यालये
३) कामगार विकास अधिकारी,कामगार क्रीडा भवन, नागपूर,पुणे.
४) सर्व कामगार कल्याण अधिकारी,(१९ गट कार्यालये) ★★★
५) सर्व केंद्र प्रमुख

★★★ यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करून द्यावे.